IJARSCT

ISSN: 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Volume 6, Issue 7, June 2026

Impact Factor: 8.2

# वैदिक काळातील नागरिक धर्म

रुपाली रघुनाथ वाडेकर

सहाय्यक प्राध्यापक, संस्कृत विभाग, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

**सारांश:** *महर्षी व्यासांनी महाभारतात आरण्यक पर्वात धर्मराज युधिष्ठिराच्या मुखी 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।' असे शब्द योजिले आहेत. धर्म ही संकल्पना अत्यंत सूक्ष्म असल्याने तिची कोणतीही ठराविक परिभाषा सापडत नाही. पण, 'धृ' या धातूपासून व्युत्पन्न झाल्याने 'धारणात् धर्म इत्याहुः।' या उक्तिचा आधार घेऊन धर्म शब्दाचा ऊहापोह लो. टिळकांनी गीतारहस्य या ग्रंथामध्ये केला आहे. आपण जो धारण करतो त्याला धर्म म्हणतात. असे करावे.. किंवा असे करू नये... असे ज्या शास्त्रांत सांगितलेले असते ती धर्मशास्त्रे होत. तसे सर्व स्मृतिग्रंथ हे धर्मशास्त्रच आहेत. पण, त्यांचा काळ हा वेदांच्या मानाने खूप अलीकडचा आहे. वैदिक काळ म्हणजे वेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदांचा काळ. वेदांमध्ये जे विधि आणि निषेध सांगितले आहेत, ती प्रवृत्ति आणि निवृत्ति सांगणारी धर्मविधानेच होत.वैदिक साहित्यातील याच विधानांच्या आधारे त्या काळातील नागरिक धर्माची संकल्पना काय असेल याचा विचार या शोधनिबंधातून केलेला आहे.*

**संकेत शब्द :** वैदिक, नागरीक, धर्म, प्राचीन, संस्कृत

## प्रस्तावना

महर्षी व्यासांनी महाभारतात आरण्यक पर्वात धर्मराज युधिष्ठिराच्या मुखी 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।' असे शब्द योजिले आहेत. धर्म ही संकल्पना अत्यंत सूक्ष्म असल्याने तिची कोणतीही ठराविक परिभाषा सापडत नाही. पण, 'धृ' या धातूपासून व्युत्पन्न झाल्याने 'धारणात् धर्म इत्याहुः।' या उक्तिचा आधार घेऊन धर्म शब्दाचा ऊहापोह लो. टिळकांनी गीतारहस्य या ग्रंथामध्ये केला आहे. आपण जो धारण करतो त्याला धर्म म्हणतात. असे करावे... किंवा असे करू नये.... असे ज्या शास्त्रांत सांगितलेले असते ती धर्मशास्त्रे होत. तसे सर्व स्मृतिग्रंथ हे धर्मशास्त्रच आहेत. पण, त्यांचा काळ हा वेदांच्या मानाने खूप अलीकडचा आहे. वैदिक काळ म्हणजे वेद, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके आणि उपनिषदांचा काळ. वेदांमध्ये जे विधि आणि निषेध सांगितले आहेत, ती प्रवृत्ति आणि निवृत्ति सांगणारी धर्मविधानेच होत. वेदांमधील तत्त्वज्ञान समजायला अवघड म्हणून उपनिषदांची प्रवृत्ति झाली. उपनिषदांनी जे तत्त्वज्ञान सांगितले त्याचे सार भगवद्गीतेत आहे म्हणून गीता हा देखील आपला धर्मग्रंथ आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी धर्म हा प्रथम आणि महत्वाचा. मोक्षापर्यंतच्या वाटेवर पहिली पायरी 'धर्म' आहे. जैमिनीच्या मीमांसादर्शनाची सुरुवात 'अथातो धर्मजिज्ञासा' या सूत्राने होते. तेथे 'धर्म' शब्दाचा तात्पर्यार्थ यज्ञकर्माशी जोडलेला आहे. आपल्या संस्कृतीत धर्म ही धारणा श्रद्धेशी जोडलेली आहे आणि श्रद्धा आपल्याला ईश्वरापर्यंत घेऊन जाते. वेदांनी, उपनिषदांनी, गीतेने सांगितले आहे की ईश्वर आपल्या हृदयात राहतो. 'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।' 'तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।' त्या ईश्वराला सर्वभावाने शरण जा असे गीता सांगते. जो धर्म सर्वाभूती असलेल्या त्या ईश्वराचे दर्शन घडवतो तो खरा धर्म. मी तसा दुसरा या जाणीवेने दुसऱ्याच्या हृदयातला ईश्वर दुखावणार नाही असे वागणे हा धर्म. प्राप्त कर्तव्याला न चुकणे आणि फळाची आशा न ठेवता कर्तव्यबुद्धिने कर्म करणे हा गीतेने सांगितलेला स्वधर्म.

धर्म संकल्पना - धर्मजिज्ञासा असेल तर आधी यज्ञ समजून घ्या असे मीमांसा दर्शन सांगते. यज्ञ म्हणजे श्रेयसाच्या प्राप्तीसाठी प्रेयसाचा त्याग. श्रेयस म्हणजे आध्यात्मिक उत्कर्ष ज्याने साधतो ते आणि प्रेयस म्हणजे मनाला जे हवेहवेसे वाटते ते इंद्रियांचे सुख. आत्मिक उन्नतीसाठी इंद्रियांना सुखावणाऱ्या विषयांचा त्याग म्हणजे यज्ञ. त्याग हेच आपल्या अस्तित्वाचे मूळ आहे. 'ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।' ब्रह्म हेच ब्रह्मामध्ये ब्रह्माद्वारेच आहूत केले जाते; हा असा पंच महाभूतांचा यज्ञ सृष्टीमध्ये अहोरात्र चालू आहे. जुने ते काळाच्या मुखी आहूत होत आहे आणि नव्याचे काळाच्याच योनीतून सृजन होत आहे आणि ही क्रिया अविरत घडत आहे. या अखण्ड यज्ञक्रियेनेच सृष्टिची धारणा होते आणि ही स्थितीच कायम रहावी म्हणून निसर्गातला प्रत्येक घटक आपापल्यापरिने जे हवनीय आहे ते ब्रह्मार्पण करीत आहे. हा यज्ञ आहे. जी पंचमहाभूते एकापेक्षा एक बलवान आहेत आणि एकमेकांना गिळून टाकण्याचे सामर्थ्य अंगी

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

बाणतात ती आपापले गुण सोडून एका समष्टीमध्ये एकत्र नांदतात. तीच स्थिती आपल्या देहाची. देहामध्ये चैतन्याच्या अधिष्ठानावर आकाश, वायू, अग्नी, जल आणि पृथ्वी ही तत्त्वे आपल्यातील वैर भावना सोडून समन्वयाने राहतात. ही देहाची धारणा म्हणजे शरीरधर्म. जे पिंडी ते ब्रह्मांडी या न्यायाने या पूर्ण सृष्टीमध्ये म्हणजे समष्टीमध्ये प्रत्येक घटक आपापल्या मर्यादा न सोडता इतर घटकांशी साहचर्याने राहतो म्हणून निसर्गचक्र चालू आहे. हा प्रकृतीधर्म आहे. निसर्गाला विचाराल तर धर्म म्हणजे परस्परांशी सलोख्याने, एकमेकांना समजून घेत, ज्याचे त्याचे अवकाश अबाधित ठेऊन वागणे. सृष्टीतील सगळ्यात बुद्धिवान प्राणि म्हणून मनुष्यावर ही जबाबदारी आहे की त्याने आपले पर्यावरण जपले पाहिजे. निसर्ग स्वतःहूनच दयाशील आहे. तो आपल्याला भरभरून देत असताना सर्व मलाच हवे म्हणून मनुष्य जे निसर्गाला ओरबाडून खातो आहे, ही हानी निसर्गाची आणि पर्यायाने आपलीच आहे. मी तसा दुसरा हा विचार निसर्गाच्या बाबतीतही केला पाहिजे. असा विचार हा आपल्याला निसर्गाप्रतीची कृतज्ञता शिकवितो. मुक्या जनावरांशी सहृदयतेने प्रेमपूर्ण व्यवहार करणे. वृक्षवेलींची लागवड करणे, त्यांना जोपासणे, प्रदूषणाला आळा घालणे, निसर्गाचा समतोल ढासळू न देणे अशी कितीतरी कर्तव्ये आपली वाट पाहात आहेत. त्यांना अवधान देणे हाही आपला धर्म आहे.

वैदिक काळातील धर्म संकल्पनेची व्याप्ती - 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम् | महाजनो येन गतः स पंथः ||' असे महाभारतात म्हंटले आहे. धर्माचे तत्त्व अत्यंत सूक्ष्म असल्याकारणाने गूढ आहे. मग, धर्म कसा कळणार?...... तर थोर मोठे महापुरुष ज्या मार्गाने गेले त्या मार्गाने जावे, म्हणजे आपणही त्याच मुक्कामी पोहचू. आपल्या संस्कृतीमध्ये व्यष्टिच्याही आधी समष्टीचा विचार केलेला आहे. समष्टी म्हणजे समूह. या समष्टीत संपूर्ण सृष्टीचा समावेश होतो. आणि व्यष्टीमध्ये जीवाचा समावेश होतो. समष्टीचा धर्म जगताना आपण आपल्या अहं-संकुचित अस्मिता त्यागून जेणेकरून व्यापक होत जाऊ तो मार्ग प्राचीन ऋषी-मुनींनी आपल्याला दाखविलेला आहे. तैत्तिरीय उपनिषदाच्या शीक्षावल्लीत ११व्या अनुवाकात कसे वागावे याचा जो उपदेश केला आहे तो याप्रमाणे की, 'सत्यं वद | (सत्य बोल) धर्मं चर | (धर्माने वाग) स्वाध्यायान्मा प्रमदः। (स्वाध्यायाला चुकू नको) आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः। (आचार्यांना इष्ट धन देऊन (गृहस्थाश्रमात प्रवेश कर) वंशविस्ताराला खंडू नकोस) सत्यान्न प्रमदितव्यम्।(सत्यापासून ढळू नकोस) धर्मान्न प्रमदितव्यम् । (धर्मापासून चळू नकोस) कुशलान्न प्रमदितव्यम्। (कल्याणाला चुकू नकोस) भूत्यै न प्रमदितव्यम्। (समृद्धीला चुकू नकोस) स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् (स्वाध्याय प्रवचनाला चुकू नकोस) । देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम्। ( देव-पितरांच्या कार्याला चुकू नकोस) मातृदेवो भव। (आईच्या ठिकाणी देव पहा) पितृदेवो भव। (पित्याच्या ठिकाणी देव पहा) आचार्यदेवो भव । (आचार्यांच्या ठिकाणी देव पहा) अतिथिदेवो भव ।(अतिथीच्या ठिकाणी देव पहा) यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि | ( जी म्हणून दोषयुक्त कर्मे नाहीत ती करावीत) नो इतराणि।(इतर नको) यान्यस्माकँ सुचरितानि तानि त्वयोपास्यानि |( जे गुरुजनांचे आदर्श आचरण ते आचरावे) नो इतराणि (इतर नको)। ये के चास्मच्छ्रेयाँसो ब्राह्मणाः तेषां त्वयाऽऽसनेन प्रश्वसितव्यम्। (ब्रह्मनिष्ठांपैकी जे श्रेष्ठ त्यांना जीवनात अधिष्ठान देऊन त्यांची आज्ञा प्रमाण करावी ) श्रद्धया देयम्। (श्रद्धेने द्यावे) अश्रद्धया अदेयम्। (अश्रद्धेने देऊ नये ) श्रिया देयम्। (श्रीमंतीने द्यावे) ह्रीया देयम्| (लज्जेने द्यावे) भिया देयम्। (आदरयुक्त भीतीने द्यावे) संविदा देयम्। (सहसंवेदनेने द्यावे) अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः युक्ता आयुक्ताः अलूक्षा धर्मकामाः स्युः यथा ते तत्र वर्तेरन् तथा तत्र वर्तेथाः। (जरी कधी काय करावे किंवा कसे वागावे असा प्रश्न उभा राहिला तरी जे तेथील योग्य, अधिकारी, विचारवंत, संवेदनशील, धर्मप्रिय, ब्रह्मनिष्ठ, संत जसे वागतील त्याप्रमाणे वागावे) अथाभ्याख्यातेषु ये तत्र ब्राह्मणाः संमर्शिनः युक्ता आयुक्ताः अलूक्षा धर्मकामाः स्युः यथा ते तेषु वर्तेरन् तथा तेषु वर्तेथाः।(दोषयुक्त व्यक्तींबरोबर वागण्याचा प्रसंग आल्यास जे योग्य, अधिकारी, विचारवंत, संवेदनशील, धर्मप्रिय, ब्रह्मनिष्ठ, संत जसे वागतील त्याप्रमाणे वागावे) एषः आदेशः। एषः उपदेशः। एषा वेदोपनिषत् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमु चैतदुपास्यम् ।।(हा आदेश आहे. हा उपदेश आहे. हे वेदोपनिषद आहे. हे अनुशासन आहे. या प्रमाणे वागावे. हेच अनुवर्तनीय आहे.)

वेदकालीन नागरीक धर्म - आपल्या ऋषींनी, संतांनी आपल्याला अशा धर्माची दीक्षा दिली आहे, जो धर्म आपल्या आयुष्यात एक शिस्त आणतो. अनुशासनातून सामूहिक अभ्युदय साधत आपल्याला आपल्या व्याप्तीचे दर्शन घडवितो. ऋग्वेदातील दहाव्या मंडलात एक द्रष्टे ऋषी सांगतात की, 'संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्। देवा भागं यथा पूर्वे सञ्जानाना उपासते ।' (तुम्ही एकमेकांशी वागताना समानतेने वागा, परस्परांसोबत चांगले बोला. तुमच्या मनात परस्परांविषयी सहसंवेदना असो. देव म्हणजे पूजनीय लोक यापूर्वी असेच वागले म्हणून ते उपास्य झाले.) ऋग्वेदाच्या त्याच सूक्तात 'समानी व आकूतिः समाना हृदयानि वः | समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति।' या ऋचेतून ऋषी सगळ्यांचे संकल्प समान असोत, सगळ्यांची हृदये समान असोत, सगळ्यांची मने समान


DOI: 10.48175/IJARSCT-37501

असोत, जेणेकरून सगळ्यांचे सहजीवन सुखमय होवो, अशा शब्दांत सगळ्यांच्या सामूहिक कल्याणाची मंगल कामना करतात. ही आपली धर्माची शिकवण म्हणजेच आपली सनातन संस्कृती आहे. मी आणि माझा हा परीघ सोडून अवघी पृथ्वी म्हणजे वसुधा हे माझे कुटुंब आहे हा स्वतःमध्येच विशाल, व्यापक होण्याचा विचार आपल्या धर्माचा पाया आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणून साऱ्यांचा विचार करून, साऱ्यांना सामावून घेऊन, त्यासाठी मनाची संवेदनशीलता जागवून, सगळ्यांशी सहकार्याची भावना ठेऊन राहणे हा वेदांनी शिकविलेला नागरिक धर्म आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१) ?gveda Samhita with commentary of Sayanachrya, Sontakke, Kashikar, Vaidik Samshodhana Mandala, Pune, 2014.

२) शास्त्री जगदीश, उपनिशत्संग्रह, मोतीलाल बनारसीदास पब्लिशर्स, दिल्ली, १९९८.

३) श्रीमद्भगवद्गीता, गोयन्दका ज., गीताप्रेस गोरखपूर, २०२३.

४) जोग द. वा., वेदान्तसार, मु. द. जोग, २००५.

५) टिळक बा. गं., श्रीमद्भगवद्गीतारहस्य, टिळक बंधु, पुणे, २००९.